## उन्हाळी शिबीर

आईने जोशूला उन्हाळी शिबिरात धाडले.....

तेथे गाणी होती, गोष्टी होत्या खेळ होते,

साहसकृती होत्या

जोशूला हे सारेच आवडत होते; हवेच होते.

पण,

तेथे वेळापत्रक होते, शिस्त होती

न ऐकल्यास शिक्षा होती

शिबीर शाळेपेक्षा वेगळे नव्हतेच मुळी!

थोडा मोकळा वेळ, थोडी स्वैरता

थोडी मैत्री, थोडी मनमुक्तता

हे असे काहीच नव्हते !

त्याला शिबीर आवडलेच नाही.

मोठ्यांना मुलांचे शिबीर घेता येतच नाही मुळी !

त्याने आईला सांगितले !